# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

जा.क्र. ६ /शि.वि./2017 दि.3/01/2017

**प्रती,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व उच्च प्राथ.शाळा, म.न.पा. नागपूर.

**विषय : राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या पालकांकडून संकल्प पत्र भरुन घेण्याबाबत.**
**संदर्भ :** मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे दि.31.12.2016 चे पत्र.

दि.25.01.2017 रोजी राज्यस्तरीय राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे संदर्भात नमूद पत्र प्राप्त झालेले आहे. या कार्यक्रमांतर्गत आपल्या शाळेतील इयत्ता 1ते8 च्या विद्यार्थ्यांना यासोबत पाठविण्यात आलेली संकल्प पत्रे दि.04.01.2017 पासून वितरीत करुन दि.08.01.2017 पुर्वी त्यांच्या पालकांकडून भरुन घेवून संलकीत करावे. व संकलीत केलेली सर्व संकल्प पत्रे शिक्षण विभागातील श्री.रामदिन बारंगे वा श्री.युवराज शेंडे, सहा.शिक्षक यांचेकडे दि.09.01.2017 पावेतो जमा करावी.

तसेच भरुन घेण्यात आलेल्या सर्व संकल्प पत्रासोबत विद्यार्थी व पालकांची यादी जोडावी. जेणेकरुन ही सर्व माहिती जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात पाठविणे सोईचे होईल. हे कार्य निवडणूकीसंबंधी असल्याने यात कुठलाही निष्काळजीपणा आढळून आल्यास संबंधितांवर निवडणूक कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(फारुक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

प्रतिलिपी माहितीस्तव,

1. मा.आयुक्त, म.न.पा. नागपूर.
2. मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर.
3. मतदार नोंदणी अधिकारी, 53,54,55,56 व 57, नागपूर.
4. मा.अति.आयुक्त-3, म.न.पा. नागपूर.

प्रतिलिपी,

1. मा.उपायुक्त(1), म.न.पा. नागपूर.
2. सर्व शाळा निरीक्षक, झोन क्र.1ते10, म.न.पा. नागपूर.
3. श्री.रामदिन बारंगे/ श्री.युवराज शेंडे, सहा.शिक्षक, शिक्षण विभाग, म.न.पा. नागपूर.

# संकल्प पत्र

मी ------------------------------------------------------------ शपथ घेतो की, मी भारतीय घटनेने मला मतदान करण्याचा जो अमूल्य अधिकार दिला आहे, त्या अधिकाराचा कोणत्याही परिस्थितीत वापर करीन.

मतदान करुन आपला उमेदवार निवडण्याचा माझा फक्त अधिकार नसून ती माझी राष्ट्रीय जबाबदारी आहे. मी अशीही शपथ घेतो की, देशहिताकरिता जनतेच्या इच्छाआकांक्ष पूर्ण करु शकणाऱ्या सर्वोत्तम उमेदवाराची निवड करण्यासाठी मी माझ्या कुटूंबातील सदस्यांना तसेच माझ्या परिचीत व्यक्तिंना मतदान करण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित करीन.

मी अशीही शपथ घेतो की, मी कोणत्याही भितीपोटी, लालसेपोटी मतदान करणार नाही, तसेच धर्मनिरपेक्ष भावनेने मतदान करण्याची जबाबदारी मी पार पाडीन.

दिनांक :-

( सही )
मतदाराचे नांव

पत्ता :-

मतदान केंद्र क्रमांक व नाव :- ----------------------------
विधानसभा क्रमांक व नांव :- -----------------------------